# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बीएनसी पॉवर प्रोजेक्टची ३ लाखांची ॲल्युमिनियम तार चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जून -**

सराटी आणि केशेगाव शिवारातील बीएनसी पॉवर प्रोजेक्ट लिमिटेडच्या वीजवाहिनीची सुमारे ८०० मीटर ॲल्युमिनियम तार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ३१ मे २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजल्यापासून ते दि.१ जून २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंतच्या कालावधीत सराटी शेत गट क्रमांक ५७ आणि केशेगाव शेत गट क्रमांक २३२ येथील बीएनसी पॉवर प्रोजेक्ट लिमिटेड, पुणे यांच्या प्रकल्पातील सुमारे ८०० मीटर ॲल्युमिनियम तार अज्ञात व्यक्तींनी चोरून नेली.

चोरीस गेलेल्या मालाची किंमत अंदाजे ३ लाख रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी कंपनीचे सुपरवायझर विजय लाला गायकवाड (रा. सलगर वस्ती, डोणगाव रोड, सोलापूर) यांनी दि. १० जून २०२६ रोजी नळदुर्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## संक्षिप्त न्युज...



### नूतन एस.टी.अधिकाऱ्यांचा सन्मान

**अणदूर, १२ जून -**

अणदूर : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या तुळजापूर आगारात नव्याने रुजू झालेले आगार व्यवस्थापक महेश रामपुरे, सहाय्यक आगार व्यवस्थापक निराशा चौरे व वाहतूक निरीक्षक पाचंगे यांचा जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अणदूरच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशांत भागवत व विठ्ठल नाईक यांनी विद्यालयाची शैक्षणिक प्रगती, बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या, महामंडळाकडून मिळालेले सहकार्य तसेच विद्यार्थी सुरक्षेबाबत माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांचे पास वितरण सुरळीत करावे व शालेय एसटी फेऱ्या पूर्ववत सुरू कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. सत्काराला उत्तर देताना रामपुरे यांनी शिक्षणमहर्षी कर्मयोगी कै.सि.ना. आलुरे गुरुजी यांच्या कार्याचा गौरव करत विद्यार्थ्यांच्या हितासाठी एसटीच्या अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली. या प्रसंगी आगार लेखाधिकारी बामणकर, आगार सहल प्रमुख सागर सूर्यवंशी, बसस्थानक प्रमुख राजकुमार चव्हाण, सिद्धेश्वर मसुते उपस्थित होते.

### मोफत गझल लेखन कार्यशाळा

**धाराशिव, १२ जून -**

गझल मंथन साहित्य संस्थेच्या वतीने युवा गझलकारांसाठी एक वर्ष कालावधीची निःशुल्क गझल लेखन कार्यशाळा लवकरच आयोजित करण्यात येणार आहे. युवा गझल स्पर्धा व अखिल भारतीय युवा गझल संमेलनाला मिळालेल्या प्रतिसादानंतर हा उपक्रम राबविण्यात येत आहे. ज्येष्ठ गझलकार डॉ. शिवाजी काळे व डॉ. स्नेहल कुलकर्णी मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेसाठी कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे असून इच्छुकांनी नोंदणी करावी, असे आवाहन सभासद सुनीता गुंजाळ यांनी केले आहे.

## पाणीटंचाईवर शिवसेनेची तातडीची मदत

## बऱ्हाणपूर ग्रामस्थांसाठी मोफत पाणीपुरवठा सुरू

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१२ जून -**

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार आणि मतदारसंघाचे माजी मंत्री तथा आमदार डॉ. तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या शिवसेना गावभेट दौऱ्यादरम्यान बऱ्हाणपूर येथील ग्रामस्थांनी तीव्र पाणीटंचाईसह विविध पाणीविषयक समस्या मांडल्या. या समस्यांची तात्काळ दखल घेत शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी गावासाठी मोफत पाणीपुरवठा सुरू केला.

यावेळी पंचायत समिती सभापती पूजा विशाल ढगे, जिल्हा परिषद सदस्या जयश्री काळे (वालवड गट), माजी सभापती निलेश शेळवणे, पंचायत समिती सदस्या श्रीलता लोखंडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विशाल ढगे, वारेवडगावचे उपसरपंच दत्ता नलवडे आदी उपस्थित होते. ग्रामस्थांनी पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या आणि त्यातून निर्माण झालेल्या अडचणी यावेळी मांडल्या.





शिवसेनेच्या ८० टक्के समाजकारण, २० टक्के राजकारण या तत्त्वानुसार युवा नेते नितीन पाटील आणि युवासेना नेते पांडुरंग धस यांनी तातडीने पुढाकार घेत ग्रामस्थांसाठी मोफत पाणीपुरवठा सुरू केला.

या उपक्रमासाठी जिल्हा परिषद धाराशिवच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, प्रशासक प्रताप गलांडे आणि ग्रामसेवक किरण आलापुरे यांचेही सहकार्य लाभले. विशेष म्हणजे, युवा नेते नितीन पाटील यांनी स्वतःच्या शेतातील ऊस पिकाची चिंता बाजूला ठेवत गावकऱ्यांच्या पाणीप्रश्नाला प्राधान्य दिले. आमदार डॉ. तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आपल्या विहिरीतील पाणी सार्वजनिक विहिरीत उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

या उपक्रमामुळे बऱ्हाणपूर गावातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून नितीन पाटील व शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या या जनहिताच्या कार्याचे ग्रामस्थांसह पंचक्रोशीतील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

## चिंचपूर खुर्द खूनप्रकरणातील मुख्य आरोपी कर्नाटकातून जेरबंद

### धाराशिव एलसीबीची धडाकेबाज कारवाई...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१२ जून -**

चिंचपूर खुर्द येथील बहुचर्चित खूनप्रकरणातील फरार मुख्य आरोपीला धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने कर्नाटकातील बसवकल्याण येथून शिताफीने पकडून आंबी पोलीसांच्या ताब्यात दिले आहे.

दि.१० जून रोजी आंबी पोलीस ठाण्यात गुरण क्र. ९३/२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), ३(५) अन्वये दाखल असलेल्या खूनप्रकरणातील




मुख्य आरोपी दीपक विक्रम गरड (रा. चिंचपूर खुर्द, ता. परंडा, जि. धाराशिव) हा फरार होता. आरोपी बसवकल्याण (कर्नाटक) येथे असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विनोद इज्जपवार यांच्या आदेशानुसार एलसीबीचे विशेष पथक बसवकल्याण येथे रवाना झाले. मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेत असताना त्याने पोलिसांना पाहून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पथकाने अत्यंत शिताफीने पाठलाग करून त्याला पकडण्यात यश मिळविले. त्यानंतर आरोपीला पुढील कायदेशीर कारवाईसाठी आंबी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या नेतृत्वाखाली सपोनि श्री. सचिन खटके, पोह. विनोद जानराव, नितीन जाधवर, बबन जाधवर तसेच चापोअ रोहित दंडनाईक यांच्या पथकाने पार पाडली.

## रूम भाड्याने देण्याचे आमिष; शीतपेयातून नशा देत तरुणीवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जून -**

रूम भाड्याने करून देण्याचे आमिष दाखवून एका ३४ वर्षीय तरुणीला शीतपेयातून नशा देत लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका गावातील ३४ वर्षीय पीडित महिलेने (नाव व गाव गोपनीय) दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा नोंद करण्यात आला. आरोपीने पीडितेला रूम भाड्याने करून देण्याचे सांगून आपल्या म्हशींच्या गोठ्यावर बोलावले. त्यानंतर जेवणासाठी जाऊ असे सांगत तिला एका हॉटेलमध्ये नेले. तेथे शीतपेयामध्ये मद्य मिसळून ते पिण्यास दिल्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

पीडितेने १० जून २०२६ रोजी दिलेल्या प्रथम माहिती अहवालाच्या आधारे धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय होणार शासकीय : आ. राणादादा



- तुळजापूर घडणार अत्याधुनिक अभियांत्रिकी शिक्षणाचे हब
- अध्यापक आणि शिक्षकेतर ११८ नवीन पदांना मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जून -**

> **जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासासाठी मैलाचा दगड..**
> या निर्णयामुळे तुळजापूर व धाराशिव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षण, अत्याधुनिक सुविधा आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचा लाभ मिळणार आहे. जिल्ह्याला उच्च शिक्षणाच्या नव्या युगात घेऊन जाणारा हा महत्त्वपूर्ण टप्पा असून, धाराशिवच्या शैक्षणिक विकासासाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानमार्फत चालविण्यात येणारे श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय हे महाविद्यालय कायमस्वरूपी महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरित करण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या निर्णयामुळे धाराशिव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना आधुनिक, दर्जेदार आणि परवडणारे तांत्रिक शिक्षण उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



या निर्णयाची माहिती देताना राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही महानगरांतील विद्यार्थ्यांप्रमाणे अत्याधुनिक अभियांत्रिकी शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या संधी मिळाव्यात यासाठी शासनाच्या माध्यमातून अत्याधुनिक प्रयोगशाळा, नवतंत्रज्ञानाधारित अभ्यासक्रम आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

धाराशिव जिल्ह्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय नसल्याने अनेक वर्षांपासून अशी मागणी होती. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विनोद तावडे, उदय सामंत तसेच विद्यमान मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. या प्रयत्नांना अखेर यश मिळाल्याचे आमदार पाटील यांनी नमूद केले.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार महाविद्यालयाचे नाव बदलून श्री तुळजाभवानी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय असे करण्यात येणार आहे. शासनाने ३०० प्रवेशक्षमतेनुसार ६० नियमित अध्यापक पदे आणि ५८ शिक्षकेतर पदांसह एकूण ११८ पदांना मान्यता दिली आहे. भविष्यात रिक्त पदे शासकीय नियमानुसार भरली जाणार आहेत.

महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि भौतिक सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होणार असून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षणाची संधी मिळणार आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' या दृष्टीकोनातून आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, सायबर सेक्युरिटी, ग्रीन टेक्नॉलॉजी, रिन्यूएबल एनर्जी आणि ईव्ही टेक्नॉलॉजी यांसारखे आधुनिक व रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले.

सध्या महाविद्यालयात कार्यरत असलेल्या पात्र कर्मचाऱ्यांना नवीन पदभरती प्रक्रियेत सहभागी होता येणार असून, निवड न झालेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन मंदिर संस्थानमार्फत देण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

## भूमिहीन शेतमजुरांना अंत्योदय शिधापत्रिका देण्याची मागणी




**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१२ जून -**

तुळजापूर तालुक्यातील भूमिहीन शेतमजुरांना अंत्योदय शिधापत्रिकांचे वाटप करून त्यांना तात्काळ मोफत धान्य योजनेचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी यशवंत सेनेचे धाराशिव जिल्हाध्यक्ष संजय घोडके यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात संजय घोडके यांनी म्हटले आहे की, तुळजापूर तालुक्यात अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर भूमिहीन शेतमजूर वास्तव्यास आहेत. मात्र, या गरजू कुटुंबांना अंत्योदय योजनेचा लाभ मिळत नसल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती अधिकच बिकट होत आहे. त्यामुळे पात्र भूमिहीन शेतमजुरांना अंत्योदय शिधापत्रिका देऊन त्यांना मोफत धान्य योजनेचा लाभ देण्यात यावा.

तसेच, ज्यांच्याकडे शेती आहे किंवा आर्थिकदृष्ट्या सक्षम असूनही अंत्योदय योजनेचा लाभ घेत आहेत, अशा लाभार्थ्यांची चौकशी करून अपात्र व्यक्तींना मिळणारा लाभ तात्काळ बंद करावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, एक-दोन वर्षांपूर्वी शिधापत्रिका काढूनही ज्यांना कोणत्याही शासकीय धान्य योजनेचा लाभ मिळत नाही, अशा कुटुंबांनाही तातडीने धान्य वितरण सुरू करण्यात यावे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. गरीब, गरजू आणि भूमिहीन शेतमजुरांना न्याय देण्यासाठी प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी. अन्यथा यशवंत सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संजय घोडके यांनी दिला आहे.

या निवेदनावर तुकाराम फडताळे, विश्वनाथ बनसोडे, गजानन फडताळे आणि अनिल बनसोडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## कळंबमध्ये बोगस खत-बियाण्यांविरोधात कारवाईची मागणी



कृषी निविष्ठा विक्री केंद्रांच्या तपासणीसाठी निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१२ जून -**

पेरणीच्या तोंडावर बोगस खत, बियाणे आणि कृषी निविष्ठांच्या विक्रीला आळा घालण्यासाठी कळंब शहरातील सर्व खत-बियाणे विक्री केंद्रांची सखोल तपासणी करून नमुने चाचणी करण्यात यावी, अशी मागणी मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेडच्या वतीने तालुका कृषी अधिकारी, कळंब यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शेतकरी आधीच आर्थिक, नैसर्गिक आणि बाजारपेठेतील विविध संकटांचा सामना करीत आहे. अशा परिस्थितीत काही कृषी सेवा केंद्रे, ग्रो एजन्सी आणि खत-बियाणे विक्री केंद्रांमधून निकृष्ट दर्जाचे अथवा बोगस खत व बियाण्यांची विक्री होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असून अपेक्षित उत्पादन मिळत नसल्याने त्यांच्यावर मानसिक तणावाचेही संकट ओढवत आहे.

दुष्काळ, अवकाळी पाऊस, वाढलेला उत्पादन खर्च, शेतीमालाला मिळणारा अपुरा दर आणि कर्जबाजारीपणा या समस्यांनी शेतकरी आधीच त्रस्त आहे. त्यातच बोगस निविष्ठांची विक्री ही शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी बाब असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सध्या खरीप हंगामातील पेरणीची लगबग सुरू असून शेतकरी मोठ्या प्रमाणात बियाणे व खतांची खरेदी करीत आहेत. मात्र याच काळात निकृष्ट दर्जाचे किंवा बोगस बियाणे विक्रीस येत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे उगवण क्षमता कमी होणे, उत्पादनात घट येणे आणि लाखो रुपयांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. संघटनांनी प्रशासनाकडे कळंब शहरातील सर्व कृषी निविष्ठा विक्री केंद्रांवर विशेष मोहीम राबवून तपासणी करण्याची मागणी केली आहे. खत, बियाणे आणि इतर कृषी निविष्ठांचे नमुने घेऊन अधिकृत प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत. तसेच विक्री परवाने, साठा नोंदी, बिल पुस्तके, गुणवत्ता प्रमाणपत्रे आणि इतर आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, उपलब्ध साठ्याची माहिती दुकानासमोर प्रदर्शित करणे बंधनकारक असतानाही अनेक ठिकाणी त्याचे पालन होत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. गतवर्षी काही बियाण्यांचे नमुने निकृष्ट अथवा बोगस असल्याचे निष्पन्न झाले होते. तरीही अशी उत्पादने बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असल्याने प्रशासनाने तातडीने कारवाई करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.

तपासणीत दोषी आढळणाऱ्या विक्रेत्यांवर संबंधित कायद्यांनुसार कठोर कारवाई करावी, त्यांचे परवाने रद्द करावेत आणि भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी नियमित तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

या निवेदनावर मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष प्रा. जगदीश गवळी, डॉ. अनिल फाटक, अरविंद शिंदे, संदीप शेंडगे, अतुल गायकवाड, ज्ञानेश्वर कुरडे पाटील आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## समतानगरातून रोड मशीनची सर्व्हिस किट व डिझेल चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जून -**

समतानगर परिसरातून रोड बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या मशीनची सर्व्हिस किट आणि डिझेल चोरी केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी दत्ताप्रसाद उत्तरेश्वर भोसले (वय ४७, रा. रऊळगाव, पोस्ट गौडगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर) यांचा टँकर (क्र. एमएच ०४ एचडी १४९७) समतानगर, धाराशिव येथे उभा होता. टँकरच्या कॅबिनमध्ये ठेवलेली रेटझेन कंपनीच्या रोड बांधकाम मशीनची सर्व्हिस किट तसेच ८० लिटर डिझेल असा एकूण ८१ हजार ५३४ रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला. या प्रकरणी मुनीशकुमार राजेशकुमार मिश्रा (रा. शहाजहानपूर, उत्तर प्रदेश, सध्या धाराशिव) आणि गॅनचंद्र सत्यवीर (रा. शहाजहानपूर, उत्तर प्रदेश, सध्या धाराशिव) यांच्यावर चोरीचा आरोप करण्यात आला आहे. आरोपींनी दि. ९ जून २०२६ रोजी हा मुद्देमाल चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

दत्ताप्रसाद भोसले यांनी दि.१० जून रोजी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## संक्षिप्त...

### लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त क्रिकेट स्पर्धा उत्साहात



तभा वृत्तसेवा

रेणापूर : माजी केंद्रीय मंत्री तथा माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त आयोजित खुल्या टेनिस क्रिकेट स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला. स्पर्धेतील विजेत्या संघांना काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके व माजी जि. प. अध्यक्ष संतोष देशमुख यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

माजी सभापती प्रदीप राठोड, रेणापूर नगरपंचायतीचे काँग्रेस गटनेते गजेंद्र चव्हाण, विलास राठोड, विकास बंजारा व कैलास चव्हाण यांच्या पुढाकारातून रूपचंद नगर रेणापूर येथील आश्रम शाळेच्या भव्य प्रागंणात या स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेत ग्रामीण भागातील १६ व शहरी भागातील १६ अशा एकूण ३२ संघांनी सहभाग नोंदविला होता. गेल्या पाच-सहा दिवसांपासून रंगलेल्या या स्पर्धेत अटीतटीचे सामने पाहायला

मिळाले. दि. १० जून रोजी झालेल्या अंतिम सामन्यात राणा इलेव्हन क्रिकेट क्लब रेणापूर आणि केंद्रे असोसिएशन क्रिकेट क्लब केंद्रेवाडी (ता. परळी, जि. बीड) हे संघ आमनेसामने आले. या सामन्यात राणा इलेव्हन क्रिकेट क्लब रेणापूर यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. केंद्रे

असोसिएशन क्रिकेट क्लब केंद्रेवाडी यांनी द्वितीय तर भगवान बाबा इलेव्हन क्रिकेट क्लब, कन्हेवाडी (ता. परळी) यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

प्रथम स्पर्धेतील विजेत्या संघांना अनुक्रमे पारितोषिक ५१ ५१ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक २५ हजार रुपये आणि तृतीय पारितोषिक ११ हजार रुपये रोख रक्कम

व ट्रॉफी प्रदान करण्यात आली. याशिवाय उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट फलंदाज आणि सामनावीर (मॅन ऑफ द मॅच) यांनाही विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी माजी सभापती प्रदीप राठोड, कांग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रमोद कापसे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, उपसभापती ॲड. शेषेराव हाके, काँग्रेस शहराध्यक्ष नितीन मोटेगावकर, नगरसेवक सचिन मोटेगावकर, गजेंद्र चव्हाण, विलास राठोड, विकास बंजारा, कैलास चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पंच म्हणून धोडाराम चव्हाण, सुनिल चव्हाण यांनी तर संकेत नेहरकर यांनी मॅचचे समालोचन केले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी गोविंद राठोड, नितीन राठोड, यशराज राठोड, संदिप चव्हाण, प्रदिप राठोड, स्तिराज राठोड, निखील चव्हाण, रोहित चव्हण आदींनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय आत्मनिर्भर अभियानाला आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा फटका

# औसा तालुक्यातील १४९२ महिला शेतकऱ्यांना लाभ, पुरुष शेतकऱ्यांना वगळले?

तभा वृत्तसेवा / सुधीर गंगणे

औसा दि. १२ जुन : यंदा हालाकीच्या दिवसात पेरणीची जुळवणी करणाऱ्या तालुक्यातील ८६ हजार शेतकऱ्यांपैकी ११ हजार ९०३ शेतकऱ्यांनी महाडीबीटी प्रणालीद्वारे कडधान्य व गळितधान्य बियाणासाठी नोंदणी केली.शासानाने यापैकी १४९२ महिला शेतक-यांची पहिली यादी तालुका कृषी विभागाकडे पाठवली असून ९८० क्विंटल बियाणाचे वाटप सुरु झाले आहे. या योजनेत अर्जाद्वारे मागणी केलेल्या पुरुष शेतकऱ्यांपैकी एकही शेतकऱ्यांचे नाव आंतरराष्ट्रीय महिला दिनामुळे आले नसून या योजनेच्या पहिल्याच यादीत आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा पुरुष शेतकऱ्यांना फटका बसला असल्याचा सूर आता औसा तालुक्यातून निघत आहे.



कधी कमी व कधी अधिक पाऊस, अवेळी पडलेल्या पावसामुळे आणि नदी नाल्यांना आलेल्या पुरामुळे शेतकरी आर्थिक नुकसानीत सापडत होता. अशा नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीतून शेतकऱ्यांना सावरता यावे. यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय गळितधान्य व कडधान्य योजना सुरु करुन सर्वच शेतकऱ्यांचा समावेश केला. या योजने अंतर्गत खरिप हंगामासाठी तुर, मुग, सोयाबीन या पिकांचा समावेश केला. या राष्ट्रीय योजनेत राज्य सरकार सहभागी झाल्याने बियाणे मागणीची महाडीबीटी प्रणालीद्वारे नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची निवड करुन त्यांना स्थानिक पातळीवर बियाणे उपलब्ध करुन देण्यात येते.



शासनाकडून अत्यल्प का होईना मात्र अनुदानावर भरवशाचे व नव्या, जुन्या वाणाचे बियाणे मिळते. म्हणुन शेतकऱ्यांनी नोंदणी केंद्रावर जाऊन १०० रुपये देऊन नोंदणी केली.यामध्ये पुरुष व महिला शेतकऱ्यांचा समावेश होता.

शासनाकडे नोंदणी केल्यामुळे आपल्याला बियाणे मिळेल या आशेवर बसलेल्या शेतकऱ्यांना यंदा सरकारच्या आंतरराष्ट्रीय महिला दिन २०२६ चा फटका बसला. या योजनेअंतर्गत एक तर खात्रीचे बियाणे आणि अनुदानासह मिळत असल्याने या योजनेतून बियाणे घ्यावे व उत्पादनात वाढ करावी. अशी अपेक्षा शेतकऱ्यांची होती. यासाठी औसा तालुक्यातील एक लाख २३ हेटरावरील ८६ हजार शेतकऱ्यांपैकी ११हजार ९०३ शेतकऱ्यांनी महाडिबीटी पोर्टलद्वारे कडधान्य व गळितधान्य बियाणाची नोंदणी केली.यापैकी १४९२ महिला शेतकऱ्यांची निवड झाली असून ९८० क्विंटल बियाणाचे वाटप सुरु झाले आहे.

या वर्षीच्या खरिप हंगामातील राष्ट्रीय कडधान्य व गळितधान्य योजनेत पुरुष व महिला शेतकऱ्यांनी नोंदणी करुनही मंजुरी काळात आंतरराष्ट्रीय महिला दिनाची आठवण समितीला आल्याने या राष्ट्रीय अभियान लाभार्थी योजनेच्या पहिल्या यादीत पहिल्यांदाच १००% महिला शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला. तसेच योजना सुरु झाल्यापासून आजपर्यंत पहिल्यांदाच पहिल्या यादीत महिला शेतकऱ्यांची निवड झाल्याने उशीरा का होईना पण राज्याच्या निवड समितीने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला. याबद्दल निवड समितीचे तालुका व गाव स्तरावर कौतुक होत आहे. तर दिवसभर वेळ काढून कागदपत्राची जुळवाजुळव करुन महाडिबीटी पोर्टलवर १०० रुपयांचा दक्षिणा देऊन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचे काय ?असा प्रश्न उभा राहत आहे. व निवड समितीच्या ऐन वेळी बदलणाऱ्या धोरणाबद्दल शेतकऱ्यांतून नाराजी पसरली आहे.

## ठाकरे नगर अडकले अतिक्रमणाच्या विळख्यात

तभा वृत्तसेवा

किनगाव दि. १२ जून : येथील ठाकरे नगर मधील काही घरकुल लाभार्थ्यांनी शासनाकडून मिळालेल्या घरकुलाचे बांधकाम नष्ट करून मोकळ्या जागेवर , रोडच्या जागेत अतिक्रमण करून ग्रामपंचायत बांधकाम परवाना न घेताच अतिक्रमित जागेत काही लोकांनी टोलेजंग इमारती, पत्र्याचे शेड , विटाचे बांधकाम, गाडी लावण्यासाठी पार्किंग शेड, अशी अनेक कच्चीवर ओके बांधकाम केले आहे. येथील त्रस्त नागरिकांनी अतिक्रमण हटवून रोड मोकळे करण्याची मागणी निवेदनाद्वारे येथील ग्रामपंचायत अधिकारी यांच्याकडे ( दि.३)केली आहे.



माजी सरपंच कै. मधुकर मुंडे यांनी येथील गोरी गरिबांसाठी शासकीय गायरान जमिनीमध्ये १६० गुरुकुलाची निर्मिती करून कै. केशव सिताराम ठाकरे नगरची निर्मिती तीस वर्षांपूर्वी केली एका घरकुल लाभधारकास एक गुंठा जागा ( अर्धा गुंठा बांधकाम व अर्धा गुंठा मोकळी जागा) देण्यात आली होती अनेक लाभार्थ्यांनी या घरकुलाची इतरांना विक्री केली तर काही लाभार्थ्यांनी रोडच्या व मोकळ्या जागेवर अतिक्रमण करून ग्रामपंचायत बांधकाम परवाना न घेता कॉलेज इमारती बांधले आहेत. या नगरात मुख्य रोड ४० फूट तर इतर रोड २० फुटाचे आहेत,. परंतु अतिक्रमणामुळे ४० फुटाचा रोड २० फूट शिल्लक राहिला आहे . या अतिक्रमणामुळे येथील अनेक रहिवाशांना याचा नाहक त्रास करावा लागत आहे.

येथील त्रस्त नागरिकांनी अतिक्रमण हटवून रोड मोकळे करण्याची मागणी निवेदनाद्वारे बुधवारी सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत अधिकारी यांच्याकडे २८ जणांच्या स्वाक्षरीचे निवेदन देण्यात आले आहे.

## सामान्य परिस्थितीतून शेतकऱ्याचा मुलगा बनला डॉक्टर



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १२ जून : तालुक्यातील नणंद येथील डॉ. वैभव बाळू पाटील यांनी आपल्या अल्पभूधारक शेतकरी वडिलांच्या पाठबळामुळे एमबीबीएस शिक्षण उत्तीर्ण करणारा हा पहिला विद्यार्थी ठरला. मेहनत, जिद्द व चिकाटीच्या जोरावर वडिलांच्या पाठपुराव्यामुळे व आई वडिलांचे आशीर्वादामुळे डॉ. वैभव हा एमबीबीएस शिक्षण पूर्ण केला या बद्दल गावात ग्रामस्थांकडून कौतुकाचा वर्षाव होत असून समस्त ग्रामस्थांच्या वतीने डॉ. वैभव बाळू पाटील यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी आई-वडिलांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी शिवसेना शेतकरी सेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब मिरगाळे, राजकुमार तांबाळे, विवेकानंद स्वामी, संतोष पाटील, दीपक लादे, राजेंद्र मिरगाळे, आत्मलिंग स्वामी, महेश गणाचार्य, शिवाजी उस्तुरे, दयानंद पाटील इत्यादी ग्रामस्थ उपस्थित होते.

## शेतकऱ्यांची गैरसोय होऊ देऊ नका : अभय साळुंके

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १२ जून : खरीप हंगाम तोंडावर आला असून शेतकरी पेरणीपूर्व तयारीमध्ये व्यस्त आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना खतांचा पुरेसा व वेळेवर पुरवठा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. शेतकऱ्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी खत विक्रेत्यांनी जबाबदारीने काम करावे, असे आवाहन काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी केले.



खरीप हंगामाच्या पार्श्र्वभूमीवर तालुक्यातील खतांची उपलब्धता, वितरण व्यवस्था आणि शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या संभाव्य अडचणी याबाबत चर्चा करण्यासाठी निलंगा येथे खत असोसिएशन सोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी अभय साळुंके यांनी खत विक्रेत्यांशी संवाद साधत शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, प्रत्येक वर्षी खरीप हंगामाच्या सुरुवातीला खतांच्या उपलब्धतेबाबत विविध समस्या निर्माण होतात. काही ठिकाणी कृत्रिम टंचाई, अवास्तव दरवाढ किंवा विशिष्ट खतांसोबत इतर वस्तूंची सक्ती याबाबत तक्रारी येतात. अशा प्रकारांना आळा बसणे गरजेचे असून शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची दक्षता खत विक्रेत्यांनी घ्यावी. शासनाने निश्र्चित केलेल्या दरानुसारच विक्री करण्याचे आवाहन केले. तसेच शेतकऱ्यांना आवश्यक त्या खतांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवावा, पावतीसह विक्री करावी आणि पारदर्शक व्यवहार करावेत, असेही त्यांनी सांगितले. शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकरी अडचणीत येणार नाही यासाठी सर्व घटकांनी संवेदनशीलतेने काम करणे आवश्यक आहे. खरीप हंगामात खतांचा पुरवठा सुरळीत राहावा आणि शेतकऱ्यांना कोणतीही अडचण भासू नये, यासाठी काँग्रेस पक्ष सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. खत विक्रेत्यांच्या कोणत्याही आडचणीत कॉग्रेस पक्ष आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीत अनेक विक्रेत्यांनी खत पुरवठ्याबाबतच्या अडचणी, वाढती मागणी आणि वाहतूक समस्यांबाबत आपली मते मांडली. यावेळी माजी प.स.सभापती अजित माने, आंबादास जाधव, सुधाकर पाटील, जि. प. सदस्य शाहीद पटेल, प्रमोद मरुरे, योगिता जाधव, रमेश मदरसे, विठ्ठल पाटील, गंगाधर चव्हाण आदीसह विविध खत विक्रेते, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## पेरणी साठी घाई नको : जिल्हाधिकारी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १२ जून : जिल्ह्यात खरीप हंगामाची पूर्वतयारी वेगाने सुरू असून शेतकऱ्यांची खते आणि बियाणे खरेदीसाठी घाई करत आहेत . परंतु जिल्ह्यात खते आणि बियाणांचा साठा मुबलक प्रमाणात असल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या पावसाची प्रतिक्षा करावी.

## कोकळगाव आरोग्य उपकेंद्राचे एक्स-रे अभियान

तभा वृत्तसेवा

निलंगा दि.१२ जून : शंभर दिवस क्षयरोगमुक्त भारत कार्यक्रमांतर्गत आयुष्मान आरोग्य मंदिर उपकेंद्र कोकळगाव कार्यक्षेत्रातील मुदगड एकोजी गावातील २५ संशयित क्षयरुग्णांचे एक्स-रे काढण्यात आले व सर्व संशयित क्षयरुग्णांना आरोग्य शिक्षण देण्यात आले.




यातील २१ एक्स-रे ग्रामीण रुग्णालय किल्लारी येथे व ४ एक्स-रे उपजिल्हा रुग्णालय निलंगा येथे काढण्यात आले.

सदर शिबिर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बालाजी शिंदे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.एस.एन तांबारे, जिल्हा हिवताप अधिकारी, डॉ.संजय पवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रदीपकुमार जाधव, डॉ. श्रीनिवास मोरे व मदनसुरी प्रा.आ. केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.स्नेहा मुळजे, डॉ.शितल साळुंखे, डॉ.वाघमारे, प्रयोगशाळा पर्यवेक्षक परमेश्र्वर करपे, वरिष्ठ औषधोपचार पर्यवेक्षक एम.एस शेख, यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले.

ग्रामीण रुग्णालय किल्लारीचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. सावनकुमार कडवकर यांचे या उपक्रमासाठी विशेष सहकार्य लाभले.

सदर शिबिर यशस्वीतेसाठी आरोग्य कर्मचारी राहुल भोसले, जयपाल रुपनर, आरोग्यसेविका छाया जाधव, आशा स्वयंसेविका निर्मला कांबळे, लता कांबळे, उर्मिला पाटील व वाहनचालक प्रदीप माने यांनी परिश्रम घेतले.

# तेरणा नदी पात्रातून वाळूचा अवैध उपसा

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १२ जून : तालुक्यातील गुंजरगा येथील शेत शिवारात तेरणा नदी पात्रातून वाळूचा अवैध उपसा करून साठवणूक केल्याप्रकरणी महसूल मंडळ अधिकारी यानी दिलेल्या अहवालावरून संबंधित शेत मालकाला तहसीलदारानी एकोणचाळीस लाख रूपयाची नोटीस बजावल्याने वाळू माफीयांचे धाबे दणाणले आहेत. तहसीलदार या प्रकरणी सुनावणी घेऊन संबंधित शेत मालक व स्थानिक कर्मचाऱ्यांवर काय कारवाई करणार याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

तालुक्यातील मांजरा व तेरणा नदीच्या वाळू घाटावर अवैध रित्या बेसूमार वाळूचा उपसा सुरू असून यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. सध्या पावसाळा तोंडावर आला असल्याने रात्री बोटीद्वारे होणारा वाळूचा उपसा दिवसा ढवळ्या सुरू आहे. टिप्पर, ट्रक्टरने वाळूची वाहतूक व अवैध साठे साठवून ठेवले जात आहेत. याकडे महसूल व पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

तालुक्यातील कोकळगाव, मदनसुरी, मानेजवळगा, सावरी, औरादशहाजानी, गिरकचाळ, शिरोळ, नदीवाडी, चिचोंडी, गुंजरगा, हालसी-तुगाव यासह आदी ठिकाणी वाळू अवैधपणे उपसा सुरू आहे. कांही ठिकाणी जेसीबी व पोकलेनच्या सहायाने मोठमोठे खड्डे खदल्याने नदीचे रुपडेच बदलून गेले आहे. यामुळे पर्यावरणाचा रहास होताना दिसत आहे. कांही भागात तर नदीकाठची शेती वाहून जात असून नदीने आपल्या पाण्याचा प्रवाहच बदलल्याचे चित्र आहे. वाळू काढण्यासाठी खोदलेल्या खड्ड्यामुळे शेतीचे नुकसान होत असल्याचे शेतकऱ्यांनी तक्रारी करूनही महसूल प्रशाहन कागदी घोडे नाचवण्यात मग्न दिसत आहे. शिवाय ठोस कारवाया केल्या जात नसल्याने वाळू माफीयाचे धैर्य वाढले आहे. नदीकाठी मोठ्या प्रमाणात मालकी जागेवर वाळू साठे साठवण्यात आले आहेत तर कांही घाटावर गायरान जमिनीवर वाळूचे साठ्याची साठवणूक केली आहे. शिरोळ ता. निलंगा येथे तर कारवाईच्या धास्तीने ताडपत्री झाकून वाळू साठे ठेवण्यात आली आहेत.

गुंजरगा ता. निलंगा गट नंबर ८४ अ मध्ये तेरणा नदीपात्रातून अवैध उत्खनन करून राचप्पा मुळे यानी शेतामध्ये अवैध रित्या १४० ब्रास वाळूची साठवणूक केल्याच्या तक्रारी वरून भुतमुगळी मंडळ अधिकारी यानी दिलेल्या अहवालावरून तहसीलदार यानी गुंजरगा ता. निलंगा येथील जमीन गट नं / स.नं.८४/अ मध्ये मौजे गुंजरगा येथील नदीपात्रातून अवैध वाळू उत्खनन करून साठवणूक केल्याचा पंचनामा अहवाल सादर करुन अंदाजे १४० ब्रास अवैध वाळू उत्खनन केले असल्याचा अहवाल सादर केला आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) व ४८(८) अन्वये गौण खनिजाच्या बाजार मुल्याच्या ५ पटीपर्यंत दंड आकारण्याची तरतुद करण्यात आली आहे. त्यानुषंगाने आपण या कार्यालयाची परवानगी न घेता वाळू अनाधिकृत पणे उत्खनन केल्याचे दिसुन येते.

त्यानुसार आपण ५५००/- रु प्रति ब्रास प्रमाणे ५५००÷ १४० ब्रास =७,७०,००००  ५=३८,५०,०००/- रूपये व जिल्हा गौण खनिज प्रतिष्टाण निधी ५५५ १४० = ७७,७००/-रूपये असे एकुण रक्कम ३९,२७,७००/- रूपये अनाधिकृत वाळू उत्खनन दंड भरणे आवश्यक आहे. करिता वरील प्रमाणे १४० ब्रासचे एकुण दंड रुपये ३९,२७,७००/-अक्षरी एकोणचाळीस लाख सत्तावीस हजार सातशे रुपये मात्र दंडात्मक कार्यवाही का करण्यात येवू नये अशी नोटीस बजावण्यात आली आहे. याबाबत नोटीस मिळाल्यापासुन सात दिवसाच्या आत माझ्या समक्ष स्वतः हजर राहून खुलासा सादर करण्यास सांगितले आहे.

आपण लेखी खुलासा सादर न केल्यास व आपला खुलासा समाधान कारक नसल्यास आपले कांहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन नियमानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल. याची नोंद घ्यावी. अशी नोटीस तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी बजावली आहे या प्रकरणात काय कारवाई होणार याकडे तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.

## सहायक पोलिस निरीक्षक अनिल खोडेवाड यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

वलांडी दि. १२ जून : महादेव कोळी संघटनेच्या वतीने देवणी येथे नूतन सहायक पोलिस निरीक्षक अनिल खोडेवाड यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी खोडेवाड यांचे देवणी येथे स्वागत करत त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस प्रशासनाची भूमिका महत्त्वाची असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

सहायक पोलिस निरीक्षक अनिल खोडेवाड यांनी सत्काराबद्दल महादेव कोळी संघटनेचे आभार मानले. नागरिकांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे तसेच सामाजिक सलोखा व शांतता टिकविण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमास महादेव कोळी संघटनेचे संजय बोरसुरे,विनायक कार्ले, उद्योजक गोविंद कार्ले,ज्ञानोबा धोत्रे,विजयकुमार धोत्रे,तसेच परिसरातील कोळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

